बी. डी. डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी प्राप्त लाभार्थींची पात्रता निश्चित करणे व अन्य अनुषंगिक बाबींसाठी सक्षम प्राधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : विविचा-२०१६/प्र.क्र.२६१ (भाग-१)/गृनिप**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ०९ जानेवारी, २०१९

वाचा - १) शासन निर्णय क्रमांक : विविचा २००७/प्र.क्र. ५१ (भाग-१)/गृनिप, दि. ३० मार्च, २०१६.
२) शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्रमांक : टिपीबी ४३१३ /४००/ प्र.क्र. १०४/२०१६/नवि-११, दि. २७ डिसेंबर, २०१६.
३) शासन निर्णय क्रमांक : विविचा-२०१६/प्र.क्र. २६१/गृनिप, दि. ०१ मार्च, २०१७.
४) शासन निर्णय क्रमांक : विविचा-२०१६/प्र.क्र. २६१ (भाग-१)/गृनिप, दि. १४ जून, २०१७.

प्रस्तावना -

महाराष्ट्र शासनाच्या संदर्भाधिन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मुंबईतील वरळी, नायगाव, ना. म. जोशी मार्ग व शिवडी येथील मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संदर्भ क्र. ३ व ४ येथील शासन निर्णयान्वये वरळी, नायगाव व ना. म. जोशी मार्ग येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाकरीता प्राप्त लाभार्थींची पात्रता निश्चित करणे व अन्य अनुषंगिक बाबींसाठी सक्षम प्राधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार, सदर प्रयोजनार्थ वरळी व ना. म. जोशी मार्ग येथील बी. डी. डी. चाळींकरीता उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), कुलाबा विभाग आणि नायगांव येथील बी. डी. डी. चाळींकरीता उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), धारावी विभाग हे सक्षम प्राधिकारी आहेत.

म्हाडाकडुन दि.२५.०७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वरळी येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाकरीता प्राप्त लाभार्थींची पात्रता निश्चिती करणे व अन्य अनुषंगिक बाबींसाठी स्वतंत्र सक्षम प्राधिकारी नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय -

संदर्भ क्र. ३ येथील दि. ०१.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुंबईतील वरळी येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी लाभार्थींची पात्रता निश्चिती करणे व अन्य अनुषंगिक बाबींसाठी उप जिल्हाधिकारी (अति / निष्कासन) कुलाबा विभाग, मुंबई शहर यांची सक्षम प्राधिकारी म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येत असुन त्याऐवजी उप जिल्हाधिकारी (अति / निष्कासन) वांद्रे-२ विभाग, मुंबई उपनगर यांना सदर

प्रयोजनार्थ सक्षम प्राधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. तथापि, ना. म. जोशी मार्ग येथील बी. डी. डी. चाळींच्या सदर प्रयोजनार्थ उपजिहाधिकारी (अति / निष्कासन), कुलाबा हेच सक्षम प्राधिकारी म्हणून कार्यरत राहतील. तसेच संदर्भ क्र. ३ व ४ येथील शासन निर्णयातील अन्य तरतुदी कायम राहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०१०९१५०१२५१४०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Manohar Ramchandra Parkar

Digitally signed by Manohar Ramchandra Parkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c4c0810e9c94cf92d42a36d93c8f7b6ac18542c1ee758c9cfddcea906d9cf544, serialNumber=fb43688343316856c0f7e793462127aa87fce45724e87929c688979 8cd7d2c62, cn=Manohar Ramchandra Parkar
Date: 2019.01.09 15:10:48 +05'30'

( म. रा. पारकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई-३५.

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

३) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.

४) मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.

५) मा. विरोधीपक्ष नेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२.

६) मा. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य.

७) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२.

८) महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा).

९) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.

१०) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई-०१.

११) जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई -०१.

१२) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, मुंबई-५१.

१३) गृहनिर्माण विभागातील उप सचिव /अवर सचिव/कक्ष अधिकारी.

१४) अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), मुंबई शहर/मुंबई उपनगर, मुंबई - ०१.

१५) उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.),कुलाबा विभाग/धारावी विभाग, मुंबई शहर, मुंबई - ०१.

१६) संचालक, मुंबई विकास विभाग चाळी, सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, मुंबई - १८.

१७) निवड नस्ती - गृनिप.